महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# शिवगौरव पुरस्कार जाहीर

13 Apr 2011, 0557 hrs IST

**SMS NEWS to 58888 for latest updates**

म. टा. प्रतिनिधी

आपल्या कर्तृत्वाचा झेंडा अभिमानाने फडकावणाऱ्या मराठी उद्योजकांना संस्कृती युवा प्रतिष्ठानच्यावतीने दिल्या जाणाऱ्या शिवगौरव पुरस्कारांची घोषणा मंगळवारी प्रतिष्ठानचे अध्यक्ष आ. प्रताप सरनाईक यांनी केली. २४ एप्रिल रोजी मा. दीनानाथ मंगेशकर यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने ठाण्याच्या सेंट्रल मैदानात आयोजित केलेल्या एका विशेष कार्यक्रमात या पुरस्कारांचे वितरण होणार असून लतादीदींसह संपूर्ण मंगेशकर कुटुंबाची उपस्थिती हे या सोहळयाचे खास आकर्षण असेल.

मराठी तरुणांना उद्योगधंद्यात रुची नसते, अशी टीका वारंवार होत असते. मात्र, या टीकेला चोख प्रत्युत्तर देत शुन्यातून विश्व निर्माण करणाऱ्या १२ कर्तृत्ववान मराठी उद्योजकांना हा शिवगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. साखरक्षेत्र, विधिमंडळ आणि शिक्षणक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे ९० वर्षांचे 'तरुण' आमदार सा. रे. पाटील, 'वदेर्वी' या सुप्रसिद्ध मोटारसायकल ब्रॅण्डचे जनक अक्षय वदेर्, अमेरिकेत मराठी शाळा आणि इंटरनेटवर मराठी पुस्तकांची विक्री करणारे मंदार जोगळेकर, स्वत: व्हिलचेअरवर जखडले गेल्यानंतर हायड्रॉलिक लिफ्टची निमिर्ती करणारे समर्थ ट्रॅव्हल्सचे प्रसाद फणसगावकर, प्रत्येक पुरस्कार सोहळयातील ग्लॅमरस ट्रॉफी तयार करणारे विजय सोनावणे, फॅशनच्या दुनियेतील विक्रम फडणीस, पतीच्या निधनानंतर गिअर पाट्र्स बनविण्याची कंपनी समर्थपणे सांभाळणाऱ्या प्रतिमा जोशी, प्रदूषण रोखण्यासाठी थरमॉलचे प्रभावी अस्त्र शोधणारे गणेश सामंत, भाकऱ्यांचा विक्रमी व्यवसाय करणाऱ्या संगीता वैती, देशातील प्रत्येक मॉलमध्ये निवडलेले कडधान्य पुरविणाऱ्या पल्लवी पालकर, स्टॅटजीर् मॅनेजमेंटच्या क्षेत्रातील प्राजक्ता पाटील आणि बॉलिवूडला डाएटिंगचा मंत्र देणाऱ्या ऋतुजा दिवेकर यांची या पुरस्कारांसाठी निवड झाल्याचे सरनाईक यांनी सांगितले.

सेंट्रल मैदानात होणारा हा सोहळा सर्वांसाठी विनामूल्य खुला असून त्याच्या प्रवेशिका १८ एप्रिलपासून समता नगर यथील विहंग पाम क्लब, सरनाईक यांचे संपर्क कार्यालय तसेच, घोडबंदर रोडवरील 'विहंग इन' या ठिकाणी उपलब्ध असतील.